# महाराष्ट्राला हायड्रो गांजाचा विळखा; थायलंड, अमेरिकेतून कुरिअर, पोस्टच्या माध्यमातून ड्रग्सची विक्री!

## पोस्ट, कस्टम आणि पोलिसांचाही सहभाग-मुख्यमंत्र्यांची विधान परिषदेत खळबळजनक माहिती

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

अमेरिका आणि थायलंडने हायड्रो गांजाला कायदेशीर मान्यता दिली आहे. मोठ्या प्रमाणात कुरिअर, पोस्टाच्या माध्यमातून देशात आणि राज्यात ड्रग्जचा व्यापार वाढला आहे. पोस्ट, कस्टमचे अधिकारी आणि पोलीस यांचा यात सहभाग आढळून आला आहे. संबंधितांवर अटकेची कारवाई तर पोलिसांना बडतर्फ केले आहे. परंतु अत्यंत सोप्या पद्धतीने बनवल्या जाणाऱ्या हायड्रो गांजाचे आव्हान समोर आहे. अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी पोलिसांचे प्रशिक्षित असे सुसज्ज युनिट तयार केल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.

राज्यातील शाळा, महाविद्यालये तसेच धार्मिक स्थळांजवळ होत असलेल्या वाढत्या ड्रग्जच्या वापर, खरेदी- विक्री संदर्भात आतापर्यंत सरकारने काय उपाययोजना केल्या याबद्दल भाई जगताप यांनी लक्षवेधी मांडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर उत्तर दिले. फडणवीस म्हणाले, शाळा आणि महाविद्यालयाजवळ मोठ्या प्रमाणात मोहीम राबवली जात असून, त्या परिसरातील पानटप-यांवर कारवाई सुरू आहे. पोलीसही यात सहभागी असल्याचे आढळले आहेत. अशा पोलिसांवर पूर्वी निलंबनाची कारवाई केली जायची पण आता त्यांच्यावर थेट बडतर्फीची कारवाई करण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

गेल्या पाच दिवसात २१ कोटी ५५ लाख किमतीचा गांजा जप्त केला. दोन इंडोनेशियन नागरिकांना अटक केली. त्यांच्या माध्यमातून २१ किलो हायड्रो गांजा जप्त केला आहे. तसेच देशातून ऑस्ट्रेलियात पळून गेलेल्या नवीन जिचकर या आरोपीलाही अटक केली. ऑस्ट्रेलियात त्याने एक आयलंड विकत घेऊन तेथील पासपोर्ट मिळवून कुरियरच्या माध्यमातून देशात हायड्रो गांजा पाठवत होता. पोलिसांनी त्याच्यावर कारवाई केली. दरम्यान केलेल्या तपासणीत पोस्ट, कस्टम आणि पोलिस सहभागी असल्याचे आढळून आले. त्यामुळे सर्वांना अटक केल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

वाढत्या ड्रग्सच्या पार्श्वभूमीवर भारतीय पोस्टासह सर्व कुरिअरला राज्य सरकारने नोटीस पाठवली आहे. परदेशातून किंवा देशातून येणारे सर्व पार्सलची पडताळणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अन्यथा संबंधित कंपन्यांना सहआरोपी केले जाईल, असा इशारा दिल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

अमली पदार्थांचे आंतरराज्यीय आणि आंतरराष्ट्रीय रॅकेट कार्यरत आहे. बाजूच्या देशांमधूनही ड्रग्ज देशात येत आहेत. याला आळा घालण्यासाठी माहितीची देवाणघेवाण सुरू असून शेजारी देशांबरोबर समन्वय साधला जात आहे. तसेच याला आळा घालण्यासाठी नागरिकांचे अँटीड्रग्ज क्लब तयार केले जाणार असून जनजागृतीवरही भर दिला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

ड्रग्ज पेडलर्स बरोबर आता याच्या संबंधित फॉरवर्ड आणि बॅकवर्ड जी साखळी असते अशा आरोपींनाही पकडले जात आहे. पोलिसांनी त्यांना पकडणे हे बंधनकारक करण्यात आले आहे. दरम्यान, कॅन्सर रुग्ण जे शेवटच्या स्टेजला आहेत अशाचाही वापरही केला जात आहे. या प्रकरणात दोन महिलांना अटक करण्यात आली आहे. तसेच इंस्टाग्रामच्या माध्यमातून विक्री केली जाते ही नवीन पद्धत वापरली जात आहे अशी खळबळजनक माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

ड्रग्जचा व्यापार फक्त मुंबई आणि वसईपुरता मर्यादित राहिलेला नाही तर लातूरमध्ये ड्रग्जमध्ये एका पोलिसाला अटक केली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये भंगारच्या नावाखाली ड्रग्ज विकले जात होते, हे समोर आले. त्याचबरोबर कुरिअरच्या माध्यमातूनही ड्रग्ज विकला जात आहे. प्रवासी गाड्यांमधून याचा गुपचूप व्यापार होता. चालकालाही याची माहिती नसते. गाडी अपेक्षित स्थळी पोहोचण्याआधीच दोन तीन किलोमीटर आधीच हे कुरिअर पार्सल काढून घेतले जाते. त्यानंतर ते महाविद्यालय, मुलांना वाटले जाते. त्यासाठी फॉर्मा आणि केमिकल्स कंपन्यांवर नजर ठेवावी, असे मागणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली.

औषधे, केमिकल कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष नियम तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. पोस्टाबरोबर सर्व कुरिअरला नोटीस दिली आहे. प्रिसिक्रिपशन शिवाय कफ सिरफ देऊ नये, मेडिकल स्टोअर्सवर सीसीटीव्ही लावणे बंधनकारक केले असून ८० टक्के सीसीटीव्ही लावले आहेत. उर्वरित २० टक्के सीसीटीव्ही लावण्याचे काम लवकरच पुर्नत्वास येईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

# राज्यातील सर्व मॉल्सनी अग्निसुरक्षेचे निकष पूर्ण न केल्यास वीज, पाणी तोडणार

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

मुंबईतील लिंक स्क्वेअर मॉल (२९ एप्रिल २०२५) व ड्रीम मॉलमध्ये वारंवार लागणाऱ्या आगींच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने फायर ऑडिटसंदर्भात कडक पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व मॉल्सचे ९० दिवसांत फायर ऑडिट पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित महापालिकांना दिले जातील. तसेच जे मॉल अग्निसुरक्षेचे निकष पूर्ण करणार नाहीत त्यांची वीज आणि पाणी जोडणी तोडण्याची कारवाई करण्यात येईल, अशी माहिती विधानपरिषदेत उत्तर देताना मंत्री उदय सामंत यांनी दिली.

सदस्य कृपाल तुमाने यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री श्री. सामंत बोलत होते. यावेळी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, सदस्य अभिजित वंजारी, मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला.

मंत्री श्री. सामंत म्हणाले की, मुंबई महापालिकेने याबाबत आधीच कारवाई सुरू केली असून, ड्रीम मॉल सध्या बंद आहे. फायर सेफ्टीसंदर्भात यापुढे कोणताही निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही आणि राज्यातील सर्व वर्ग 'ब', 'क', 'ड' महापालिकांनी मॉल्सच्या अग्निसुरक्षा अनुपालन तपासावेत. आवश्यकता असल्यास महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण अधिनियम २००६ च्या तरतुदींनुसार कडक कारवाई केली जाईल, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.

# 'बार्टी', 'सारथी', 'महाज्योती' आणि 'आर्टी'मध्ये क्रांतिकारी बदल!

## यापुढे फक्त गुणवत्तेवरच प्रवेश; एका विद्यार्थ्यामागे 30 लाख खर्चाचा खुलासा - उपमुख्यमंत्री अजित पवारांचा मोठा निर्णय

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

राज्यातील बार्टी, सारथी, महाज्योती आणि आर्टी या महत्वाच्या संस्थांमध्ये आता गुणवत्तेच्या आधारेच प्रवेश दिला जाणार असल्याची मोठी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधान परिषदेत केली आहे. या संस्थांच्या कार्यपद्धतीत समानता आणि सुसूत्रता आणली जाणार असून, त्यासाठी लवकरच निर्णायक निर्णय घेतला जाणार आहे.



विधान परिषद सदस्य संजय खोडके आणि अभिजीत वंजारी यांनी सारथी संस्थेच्या घरभाडे भत्ता आणि आकस्मितता निधी वितरणाबाबत प्रश्न उपस्थित केला. याला उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, "२०१८ ते २०२५ या कालावधीत सारथी संस्थेमार्फत ८३ अभ्यासक्रमांसाठी ३ लाख विद्यार्थ्यांना विद्यावेतन व शिष्यवृत्ती दिल्या गेल्या. मात्र, त्यापैकी फक्त १ टक्का म्हणजे ३ हजार विद्यार्थ्यांनी पीएचडीसाठी प्रवेश घेतला. या १ टक्क्यासाठी तब्बल २८० कोटी रुपये खर्च झाले. एका विद्यार्थ्यामागे सरासरी ३० लाख रुपये खर्च होत आहेत, ही बाब अत्यंत गांभीर्याने घेण्याची गरज आहे." यापुढे रोजगार देणाऱ्या अभ्यासक्रमांनाच प्राधान्य देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल प्राप्त झाला असून, विद्यार्थी संख्या, शिष्यवृत्तीची रचना, प्रवेश प्रक्रिया यामध्ये एकसमान धोरण लागू करण्याचा निर्णय लवकरच घेतला जाणार असल्याचे अजित पवारांनी सांगितले.

या निर्णयामुळे राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि करिअरच्या संधींमध्ये आमूलाग्र बदल घडणार असून, शिक्षण क्षेत्रातील गैरव्यवहार आणि अनावश्यक खर्चावर लगाम बसेल, असे तज्ञांचे मत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या या निर्णयामुळे गुणवत्तेला प्राधान्य देणारी, पारदर्शक व्यवस्था तयार होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# अदानी, अंबानीला नजरेसमोर ठेवून धोरणे आखू नका!

## भास्कर जाधव यांचा सरकारवर घणाघात: शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजाराची मदत देण्याची मागणी

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

अदानी, अंबानीला नजरेसमोर ठेवून धोरणे आखू नका. राज्य सरकारची धोरणे ही सर्वसामान्य माणूस डोळ्यासमोर ठेवूनच आखली गेली पाहिजेत. राज्यातील शेतकऱ्यांची आजची अतिशय स्थिती चिंताजनक आहे. त्यामुळे सरकारने अहंकार, मुजोरीपणा बाजूला ठेवून शेतकऱ्यांचा उपमर्द करण्याचे टाळावे, असा घणाघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गटनेते भास्कर जाधव यांनी गुरुवारी विधानसभेत केला. मे महिन्यात झालेल्या पावसाने शेतकरी अडचणीत आला असून त्याला प्रति हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

विरोधी पक्षाच्या वतीने आज विधानसभेत शेतकऱ्यांच्या प्रश्नावर नियम २९३ अन्वये प्रस्ताव मांडण्यात आला. या प्रस्तवावरील चर्चेला सुरुवात करताना भास्कर जाधव यांनी शेती आणि शेतकरी प्रश्नी असलेल्या सरकारच्या धोरणांवर टीका केली. तसेच कृषी मंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांना उद्देशून



केलेल्या विधानांचाही त्यांनी समाचार घेतला. मत्सोद्योगाला शेतीचा दर्जा दिल्याबद्दल सरकारचे अभिनंदन करताना भास्कर जाधव यांनी या निर्णयात स्पष्टता आणण्याची मागणी केली.

विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी पक्षाने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, सत्तेत येताच योग्यवेळी कर्जमाफीचा निर्णय घेऊ, असे आता सांगितले जात आहे. त्यामुळे तुमची ती योग्यवेळी कधी येणार? हा शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळण्याचा प्रकार आहे. आज शेतकऱ्याला नांगरणीसाठी स्वतःला खांद्यावर नांगर घ्यावा लागत आहे. त्याच्या पत्नीला नांगर ओढावा लागत आहे. शेतकऱ्याने स्वतःला जुंपून घेऊन नांगर ओढावा हेच सरकारचे व्हिजन आहे काय? असा सवाल जाधव यांनी केला. शेतकऱ्यांप्रति सरकारमध्ये प्रेम, कणव काहीच नाही. त्यामुळे जाहिरातीबाजी करून निवडणुका जिंकता येतात पण त्याने राज्याची प्रगती होत नाही, असेही त्यांनी सरकारला सुनावले.

मायबाप सरकारमधील मंत्री शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी त्यांची कुचेष्टा करतात, टिंगलटवाळी करतात. मंत्री शेतकऱ्यांना म्हणतात की कर्जाच्या पैशांतून तुम्ही मुलीचा साखरपुडा करता. शेतकऱ्यांनी आपल्या मुलांच्या लग्नाचे स्वप्न पाहायचे नाही काय? मंत्र्यांच्या अशा भाषेतून त्यांचा अहंकार दिसतो. खरेतर सरकारने लगडलेल्या फळांच्या झाडाप्रमाणे नम्र असायला हवे. पण मंत्री शेतकऱ्यांचा अवमान करत असताना त्यांच्या वरिष्ठांकडून त्यांचे कान टोचले जात नाहीत, अशी खंत जाधव यांनी व्यक्त केली. सरकारने अडचणीत सापडलेल्या शेतकरी, बागायतदार, मच्छीमार यांच्या मदतीसाठी पॅकेज जाहीर करावे, अशी मागणीही त्यांनी केली.

# मुंबई महापालिका कर्मचाऱ्यांच्या सेवा निवास स्थानासाठी समिती-मंत्री सामंत

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

मुंबई महापालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार महापालिकेची सेवानिवासस्थाने त्यांच्या नावे करण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमण्यात येईल. या समितीत मुंबईतील आमदारांचा समावेश केला जाईल. ही समिती सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना महापालिकेचे सेवानिवासस्थान त्यांच्या नावे करण्याबाबत धोरण निश्चित करेल. राज्य सरकारने हे धोरण मान्य केले तर त्याची अंमलबजावणी केली जाईल, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी बुधवारी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. शिवसेना शिंदे गटाचे आमदार तुकाराम काते यांनी आज विधानसभेत चेंबूर घाटला येथील मुंबई महापालिकेच्या वसाहतीमधील संक्रमण छावणीतील घरे चतुर्थश्रेणी कामगारांच्या नावे करण्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. यावेळी बोलताना काते यांनी कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्ती नंतरही सेवानिवासस्थाने रिक्त न केल्याने मुंबई महापालिकेने कर्मचाऱ्यांचा भविष्यनिर्वाह निधी, उपदान, रजा रोखीकरण आदी लाभ रोखून धरल्याकडे लक्ष वेधले.


## बृहन्मुंबई महानगरपालिका

(जल अभियंता विभाग)

क्रं. एचई/एईओसी/१७१७/टीएम दि.०३.०७.२०२५

### ई-निविदा सुचना

बृहन्मुंबई महानगरपालिकेव्दारे खालील नमुद विषयांकित कामांसाठी, इच्छुक निविदाकारांकडुन ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा वितरण व विक्री दिनांक आणि वेळ, निविदा विक्री नियत दिनांक आणि वेळ या बाबतचा तपशीलवार बृहन्मुंबई महानगरपालिके ची वेबसाईट अर्थात http://portal.mcgm.gov.in वर आणि महाटेंडर संकेतस्थळावर अर्थात http://mahatenders.gov.in निविदा अवलोकन अर्तगत प्रसिद्ध / अपलोड करण्यात आली आहे.

| अ.क्र. | निविदा क्रमांक | निविदेचा विषय |
|---|---|---|
| १. | 2025_MCGM_1196896_1 | सहाय्यक अभियंता नगरबाह्य विभाग (प्रजवा) या विभागातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात तसेच CTS प्लॉट क्रं. ९६ भूखंडावर लोखंडी सुरक्षा केबिनचा पुरवठा तसेच स्थापना करण्याचे काम करणेबाबत. |

इच्छुक निविदाकारानी तपशीलवार माहितीकरिता महाटेंडर संकेतस्थळावर अर्थात http://mahatenders.gov.in आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेची वेबसाईट अर्थात http://portal.mogm.gov.in वर भेट द्यावी.

सही/-
कार्यकारी अभियंता
(प्रमुख कामे) जल कामे

पीआरओ/८८२/जाहि./२०२५-२६

थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा


# मुंबईतील कबूतर खान्यांबाबत मनपाने विशेष अभियान राबवावे

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

सध्या मुंबई महापालिकेच्या हद्दीत ५१ कबूतरखाने आहेत. या ठिकाणी कबूतरांमुळे श्वसनविकार, दुर्गंधी व प्रदूषण वाढत असून, यावर नियंत्रण आवश्यक आहे. त्यादृष्टीने कबूतर खाण्यांबाबत तातडीने विशेष ड्राईव्ह घेण्याबाबत मुंबई महापालिकेला आदेश देण्यात येतील असे मंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत सांगितले.

सदस्य मनिषा कायंदे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते. यावेळी सदस्य चित्रा वाघ यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.


मुंबईतील कबूतरखाने आणि त्यामुळे होणाऱ्या आरोग्यविषयक त्रासाबाबत मंत्री सामंत यांनी विधानपरिषदेत माहिती दिली.

काही कबूतरखाने न्यायालयाच्या आदेशानुसार बंद करण्यात आले होते असे सांगून मंत्री सामंत म्हणाले की, हे कबूतरखाने पुन्हा सुरू झाल्याचे निदर्शनास आले आहे. नागरिकांनी कबूतरांना धान्य टाकणे थांबवावे यासाठी जनजागृती आवश्यक आहे. महापालिकेला एक महिन्यात कबूतरखाने बंद करण्यासाठी विशेष ड्राइव्ह राबवण्याचे आणि जनजागृती मोहिम सुरू करण्याचे निर्देश लवकरच दिले जातील, असेही त्यांनी सांगितले.

# शाळाबाह्य विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा शासनाचा प्रयत्न- शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

शासन विद्यार्थ्यांची घटती पटसंख्या, शाळाबाह्य विद्यार्थी आणि शिक्षणाच्या गुणवत्तेसंदर्भात गंभीर असून सर्वंकष उपाययोजना राबवत आहे. यु-डायस (UDISE) प्रणालीच्या आकडेवारीनुसार विद्यार्थ्यांची संख्या काहीशी घसरलेली असली तरी त्यामागील कारणे समजून घेऊन योग्य ती कार्यवाही केली जात आहे, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानपरिषदेत सांगितले. नियम ९२ अन्वये अर्धातास चर्चेला उत्तर देतं मंत्री भुसे बोलत होते.



मंत्री श्री. भुसे म्हणाले की, अनेक विद्यार्थी दहावी नंतर आयटीआय, डिप्लोमा आदी अभ्यासक्रमांकडे वळतात. मात्र, त्यांच्या शाळेतील रेकॉर्ड अद्ययावत होत नसल्यामुळे ते 'ड्रॉपआउट' म्हणून नोंदविले जातात. राज्यात शाळाबाह्य विद्यार्थ्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी १ ते १५ जुलै दरम्यान विशेष मोहिम राबवली जात आहे. आधार लिंकिंग आणि अपार आयडी (विद्यार्थ्यांसाठी युनिक कोड) यामार्फत प्रत्येक विद्यार्थ्याचा शिक्षण प्रवास ट्रॅक केला जाणार आहे. सध्या राज्यात ८६% विद्यार्थ्यांचा डेटा संकलित झालेला असून ९५% आधार लिंकिंग पूर्ण झाले असल्याचेही मंत्री भुसे यांनी सांगितले.

मंत्री श्री.भुसे म्हणाले की, शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण, विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, गणवेश, पोषण आहार, स्वच्छ शाळा, शुद्ध पिण्याचे पाणी, शौचालये, आणि खेळांची सुविधा यासाठी विशेष भर दिला जात आहे. आतापर्यंत ९ हजार उच्चशिक्षित शिक्षक नियुक्त झाले असून आणखी १० हजार भरती प्रक्रियेत आहेत.

मंत्री भुसे यांनी स्पष्ट केले की, कोणतीही शाळा बंद होणार नाही आणि प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्ता पूर्ण व आनंददायी शिक्षण मिळावे, हे शासनाचे उद्दिष्ट आहे. या कामात सर्व जनतेने आणि लोकप्रतिनिधींनी सहकार्य करावे, असेही आवाहन त्यांनी केले.

# अखिल दाभोळखाडी भोई समाजाच्यावतीने विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

अखिल दाभोळखाडी भोई समाज, रत्नागिरी या नोंदणीकृत समाजसंस्थेच्यावतीने शै. सां. क्रिडा समितीच्या व्यवस्थापनाखाली समाजाचे विद्यमान उपाध्यक्ष मुरलीधर गं. खडपेकर यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक वर्ष, २०२४-२५ वर्षासाठीचा विद्यार्थी गुणगौरव सोहळा एल. के. वाघजी पब्लिक स्कूल, मांटुगा, मुंबई येथील सभागृहात अतिशय भव्य दिव्य स्वरुपात संपन्न झाला.




विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे व्यवस्थापक असलेल्या शै. सां. क्रीडा समितीचे विद्यमान सचिव प्रविण प्र. सैतवडेकर यांनी उपस्थितीतांचे आणि मान्यवरांचे स्वागत केले व कार्यक्रमाचे स्वरूप स्पष्ट केले. शै. सां. क्रीडा समितीच्या पदाधिकाऱ्यांच्यावतीने उपस्थित समाज कार्यकारिणी, सातगाव पदाधिकारी, समित्यांचे पदाधिकारी आणि अन्य मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. समाजाच्यावतीने सचिव रामचंद्र स. पडवळ यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केले. 'टाटा स्ट्राईव्ह' या संस्थेच्यावतीने रुपेश पाटील आणि श्री. सुरज हांडे यांनी संस्थेच्या विनामुल्य 'प्रशिक्षण अभ्यासक्रम आणि रोजगाराच्या संधी' याविषयीचे मार्गदर्शन केले. विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यादरम्यान उपस्थित, १६ पदविका, पदवी, पदव्युत्तर उत्तीर्ण, ८० बारावी उत्तीर्ण आणि ७२ दहावी उत्तीर्ण एकुण १६८ गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

कार्यकमादरम्यान, प्रशासकीय कामकाज समितीचे अध्यक्ष, सुनिल का. निगडे, अंजनवेल सातगाव ग्रामीण विभागाचे अध्यक्ष, अनिल अ. खडपेकर समाजाचे प्रमुख मार्गदर्शक, आर. आर. जाधव आणि समाजाचे अध्यक्ष शांताराम य. जाधव आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष, मुरलीधर गं. खडपेकर यांनी उपस्थित गुणवंत विद्यार्थ्यांना भविष्यातील शैक्षणिक, व्यावसायिक आणि समाजिक वाटचालीविषयी मार्गदर्शन केले. उपस्थित राहिलेले विद्यार्थी, पालकवर्ग, गाव/सातगाव पदाधिकारी, समाजबांधव तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतलेल्या शै. सां. क्रीडा समितिच्या सर्वच पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे समाजकार्यकारिणीच्यावतीने समाज अध्यक्ष शांताराम य. जाधव साहेबांनी आभार मानले आणि अभिनंदनही व्यक्त केले.

अंजनवेल सातगाव विभाग ग्रामीणचे अध्यक्ष श्री. अनिल अं. खडपेकर यांनी विद्यार्थी गुणगौरव सोहळयासाठी ग्रामीण विभागातून आवर्जून उपस्थिती नोंदविली. त्याचबरोबर अंजनवेल सातगाव ग्रामीण विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमात प्रत्यक्ष उपस्थित राहून समाजाच्यावतीने प्रदान करण्यात आलेला सन्मान स्विकारला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रविण सैतवडेकर यशस्वीपणे पार पाडले. त्याचबरोबर कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न करण्यासाठी क्रीडा समितीच्या सर्वच मुख्य पदाधिकारी आणि सदस्यांचे मोलाचे योगदान लाभले. विशेषतः विद्यार्थी गुणगौरव समारंभानिमित्त भिले गावाचे सदस्य रविंद्र तु. निगडे यांनी प्रतिवर्षाप्रमाणे विशेष गुणवत्ताधारक अग्रमानांकित विद्यार्थ्यांसाठी बक्षिसे प्रायोजित केली होती. त्यांचेही समाज कार्यकारिणीच्यावतीने आभार मानण्यात आले.


## जाहिर निविदा (टेंडर)

छत्रपती संभाजी महाराज सहकारी पतसंस्था मर्यादित पिंपोडे बु॥. ता. कोरेगाव, जि. सातारा संस्थेच्या शाखा - नेरुळ, नवी मुंबई येथिल इमारतीचे बांधकाम करावयाचे असून, त्याबाबतचे प्लॅन आमच्या संस्थेने तयार करुन घेतले आहेत. तरी मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे व रायगड जिल्ह्यातील सर्व इमारत बांधकाम व्यावसायिक यांचेकडून कामाच्या निविदा (टेंडर) दिनांक ११/०७/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत संस्थेच्या मुख्यकार्यालयात पोहोच होतील असे पाठवावेत. इमारत बांधकाम बाबतचा प्लॅन व इतर माहिती संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध केली आहे.

**सरव्यवस्थापक छत्रपती संभाजी महाराज सहकारी पतसंस्था, मर्या पिंपोडे बु॥., ता. कोरेगाव, जि. सातारा.**

ANAND RATHI

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई – ४०००६३ भारत
मोबाईल: +918433508283 वेबसाइट:www.rathi.com

### ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे https://sarfaesi.auctiontiger.net वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव: (१) मेसर्स डेअरी कॉर्नर (कर्जदार), दुकान क्रमांक १५, शिव साई सोसायटी, पाचपाखडी, सरस्वती इंग्लिश मीडियमजवळ, टेकडी बंगला, ठाणे पश्चिम, ठाणे: ४००६०२. | |
| सह-कर्जदाराचे नाव: (२) श्री शैलेश मंडलिक (सह-कर्जदार), फ्लॅट नं. ३०१, पार्वती सीएसएल, तिसरा मजला, आम्रपाली हॉटेलच्या वर, गडकरी रंगायतन जवळ, तळोपाली, ठाणे पश्चिम: ४००६०१. (३) सौ. अनिता शैलेश मंडलिक (सह-कर्जदार), फ्लॅट क्र. ३०१, पार्वती सीएसएल, तिसरा मजला, आम्रपाली हॉटेलच्या वर, गडकरी रंगायतनजवळ, तळोपाली, ठाणे पश्चिम: ४००६०१. | |
| मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट क्रमांक ३०१, तिसरा मजला, पार्वती चॅन्सिल, सेंट जॉन द बॅप्टिस्ट हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेजजवळ, अहिल्यादेवी होळकर मार्ग, सीटीएस क्रमांक २२७, २२३अ, २२३, टीका क्रमांक १३, गाव चरई, ठाणे (पश्चिम), ठाणे: ४००६०१. महाराष्ट्र, भारत. | |
| थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार) | रू. ५२,४६,३४९/- (रुपये बावन्न लाख छेचाडीस हजार तीनशे एकोणपन्नास फक्त) |
| लिलावाची तारीख | ४ ऑगस्ट २०२५ |
| राखीव किंमत | १,१२,३२,000/- रुपये (रुपये एक कोटी बारा लाख बत्तीस हजार फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किमतीच्या १0% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रू.१0,000/- (फक्त दहा हजार रुपये) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ | २८ जुलै २०२५ सकाळी १0 ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ. | १ ऑगस्ट २०२५ दुपारी ४.00 वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | ४ ऑगस्ट २०२५ सकाळी १0:00 ते दुपारी १.00 दरम्यान |
| टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तींसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात. | |

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली ३० दिवसांची नोटीस देखील आहे.

तारीख: ३ जुलै २०२५
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरी